**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation : (0240) 2403118/2403119/2403115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

स्थापना वर्ष : १९५८

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ / २०१९-२०२०/ 11076-11528 दि. १३/०३/२०२० 14

**प्रति,**
**प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,**
**औरंगाबाद.**

**विषय :- प्रशासकिय व शैक्षणिक लेखा परिक्षण करण्यासाठी ऑनलाईनद्वारे प्रस्ताव सादर करणे संदर्भात मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ :- १) व्यवस्थापन परिषदेचे सन्माननिय सदस्य डॉ.राजेश करपे व डॉ.फुलचंद सलामपुरे यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विद्यापीठास सादर केलेला अर्ज दिनांक ०९-०३-२०२०**
**२) विद्यापीठ अध्यादेश १००४/२०१९ निर्गमित दिनांक ०९-१२-२०१९**
**३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (१)व (२)अन्वये करण्यात आलेली तरतुद.**
**४) प्रसाकीय व शैक्षणिक लेखा परिक्षणासाठी प्रस्ताव सादर करणे संदर्भात विद्यापीठाने निर्धारित केलेले दिनांक ३१-१२-२०१९,१०-०२-२०२०,२६-०२-२०२०**

**महोदय,**

**उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (१) व (२)तसेच विद्यापीठ अध्यादेश १००४/२०१९ अन्वये विहित केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षण करणे अनिवार्य असुन तद्अनुषंगाने विद्यापीठाने यापुर्वी संदर्भ क्र.४ अन्वये तीसऱ्यावेळेस ऑनलाईनद्वारे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.२६-०२-२०२० पर्यत मुदतवाढ निर्धारित करण्यात आलेली होती परंतु काही तांत्रिक कारणास्तव एकुण ७१ महाविद्यालयांनी उक्त प्रकरणी प्रस्ताव सादर न केल्यामुळे सर्वसंबधित महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासुन संलग्निकरण देण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये म्हणून संदर्भ क्र.(१)अन्वये करण्यात आलेल्या विनंती नुसार शेवटची संधी म्हणून ऑनलाईनद्वारे विद्यापीठास सॉप्ट कॉपी/प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.२०-०३-२०२० पर्यत व तद्अनुषंगोन दि.२१-०३-२०२० पर्यत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागास हार्ड कॉपी सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे**

**प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (३) (क) अन्वये विहित मुदतीच्या आत संलग्निकरणाचे नुतनिकरण करण्यासाठी विद्यापीठ अध्यादेशानुसार विहित शुल्कासह अर्ज सादर केला नाही,अशा महाविद्यालयांनी व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार अभ्यासक्रम निहाय मुळ शुल्काच्या १०% अतिरिक्त शुल्कासह व ज्या महाविद्यालयांनी उक्त प्रकरणी संलग्निकणाचे नुतनिकरण करण्यासाठी विहित मुदतीच्या आत विद्यापीठास अर्ज सादर केलेले आहे परंतु कलम ११७ (१) व (२)अन्वये विहित मुदतीच्या आत शैक्षणिक व लेखा परिक्षणासाठी प्रस्ताव सादर केलेला नाही अशा महाविद्यालयांनी रु १००० दंडासह उक्त प्रकरणी दि.२०-०३-२०२० पर्यत ऑनलाईनद्वारे व दि.२१-०३-२०२० पर्यत हार्ड कॉपी विद्यापीठास सादर करणे अनिवार्य राहील अन्यथा शैक्षणिक**

वर्ष २०२०-२०२१ पासुन सर्व संबधित महाविद्यालयांना संलग्निकरण पत्र तसेच तद्अनुषंगाने सर्व संबधित महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही,याची कृपया सर्व संबधितांनी गांभिर्याने नोंद घेण्यात यावी, हि विनंती.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

प्रतिलिपीः

१. श्रीमती नजमा शेख, मा.कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या पत्राची एक प्रत देण्यात येवून विनंती करण्यात येते की, सदरील पत्राची प्रत मा.कुलगुरु महोदयांसमोर माहितीस्तव सादर करण्यात यावी.

२. डॉ.श्रीमती सुनिता अंकुश मा .प्र कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या पत्राची एक प्रत देण्यात येवून विनंती करण्यात येते की, सदरील पत्राची प्रत मा . प्र कुलगुरु महोदयांसमोर माहितीस्तव सादर करण्यात यावी.

३. या पत्राची एक प्रत मा.संचालक ,युनिक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना देण्यात येवुन विनंती करण्यात येते की, या पत्रामध्ये विनर्धिष्ठित करण्यात आल्यानुसार यथायोग्य कार्यवाही करुन उक्त प्रकरणी ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्रस्ताव प्राप्त करून घेण्यात यावे व तद्अनुषंगाने शैक्षणिक विभागाच्या आवश्यकतेनुसार प्राप्त प्रस्तावांबाबतची माहिती dyregistrar.acad@bamu.ac.in या ई मेल आयडीवर सादर करण्यात यावे,हि विनंती.

४. मा.अध्यक्ष/सचिव,सर्व संलग्नित महाविद्यालये ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)